जनसंपर्क कक्ष
13 NOV 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समस्यांची जाणीव असणारे नेतृत्वच सच्चे

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन
- संशोधन पुस्तिकेचे प्रकाशन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रामीण बँक उपक्रमाचे उद्गाते, अर्थतज्ज्ञ मुहम्मद युनूस यांनी तीन शून्यांचा विचार करण्याचे जगाला आवाहन केले आहे. त्यामध्ये शून्य गरीबी, शून्य बेरोजगारी आणि शून्य प्रदूषण यांचा समावेश आहे. या तीन शून्यांसाठी कार्यरत व्यवस्थेचे जे नेतृत्व असते खरे नेतृत्व होय. नागरिकांच्या समस्या सोडवण्याची जाणीव असणारे नेतृत्वच सच्चे असते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठातील दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या (स्व.) रा. ना. गोडबोले अध्यासनातर्फे संशोधन पुस्तिका प्रकाशन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुणे येथील सिंहगड कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्समधील डॉ. राजू श्रावस्ती लिखीत 'लीडरशिप इन बँकिंग सेक्टर : चेंजिंग सिनॅरिओ इन ट्वेंटी फर्स्ट सेंच्युरी' संशोधन पुस्तिकेचे प्रकाशन झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, बँकिंग क्षेत्रातील नेतृत्वाच्या सर्वंकष वाटचालीचा संशोधनात्मक आढावा घेऊन त्याचे पुस्तिकारुपाने प्रकाशनाचा अध्यासनाचा उपक्रम स्तुत्य आहे. ज्ञाननिर्मितीच्या अशा अधिकाधिक वाटा शिक्षक, संशोधकांनी चोखाळल्या पाहिजेत.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे भाषण झाले. डॉ. राजू श्रावस्ती यांनी माहिती दिली. डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, तेजपाल मोहरेकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संशोधन पुस्तिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. नांदवडेकर, डॉ. महाजन, डॉ. मारुलकर, डॉ. ए. एम. गुरव आदी.

13 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एनसीसी गटमुख्यालयाचा पाणी प्रश्न सोडवू

## कुलगुरूंची ग्वाही : एनसीसीचे प्रमुख ब्रिगेडिअर समीर साळुंखे यांची भेट

टेंबलाईवाडी, ता. १२ : 'एनसीसी' कोल्हापूर गटमुख्यालयाला छात्रसैनिक शिबिरांदरम्यान भेडसावणारा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सहकार्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. गुरुवारी एनसीसी गटमुख्यालयाचे नूतन प्रमुख ब्रिगेडिअर समीर साळुंखे यांनी कुलगुरूंची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.

विद्यापीठाच्या आवारात असलेल्या एनसीसीच्या गटमुख्यालयाला एनसीसी कॅम्प सुरू असताना बाहेरून टँकरने पाणी विकत घ्यावे लागते, या प्रश्नाकडे ब्रिगेडिअर साळुंखे यांनी लक्ष वेधले. यावर कुलगुरूंनी तत्काळ पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली. ते म्हणाले, "अडथळा शर्यतीसाठी मैदान विकसित करताना विद्यापीठाच्या क्रीडा संकुलाचा भाग म्हणून विकसित केले जाईल आणि समन्वय ठेवून एनसीसी या मैदानाचा छात्रसैनिकांसाठी उपयोग करू घेऊ शकेल." या भेटीवेळी फायरिंग रेंज कोल्हापुरात आकाराला यावे, यासाठी संयुक्तपणे प्रयत्न करण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले. या वेळी लेफ्टनंट कर्नल सुनीलकुमार व ऑनररी मेजर प्रा. डॉ. रूपा शहा आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : एनसीसी गटमुख्यालयाचे नूतन प्रमुख समीर साळुंखे यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेतली. यावेळी लेफ्टनंट कर्नल सुनीलकुमार व ऑनररी मेजर प्रा. डॉ. रूपा शहा उपस्थित होत्या.

पुढारी

# नवउद्योजकांना 'स्टार्टअप'साठी शिवाजी विद्यापीठात संधी



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवउद्योजकांना 'स्टार्टअप'साठी शिवाजी विद्यापीठात संधी देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील लिंकमध्ये रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

कृषी, अभियांत्रिकी, अन्न व तंत्रज्ञान, औषध निर्माणशास्त्र तसेच पर्यावरण व सामाजिक समस्यांचे निराकरण करू शकणाऱ्या आणि उद्योगात रूपांतर होऊ शकणाऱ्या कल्पना मांडणाऱ्या विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिक यांना महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी व शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र यांच्यातर्फे 'स्टार्ट-अप' विषयक संधी देण्यात येत आहे. इच्छुक नवउद्योजकांना 'स्टार्टअप'साठी प्रोटोटाईप निर्मिती, कंपनी नोंदणी, नवीन उत्पादन, विक्री नियोजन, व्यवसाय आराखडा, याबाबत मार्गदर्शन व आर्थिक मदत मिळणार आहे. इच्छुकांनी त्यासंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील (www.unishivaji.ac.in) 'news & event' सदरामध्ये 'नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे' या नावावर क्लिक करून त्यामधील रजिस्ट्रेशन लिंकवर क्लिक करून गुगल फॉर्म भरावा. २३ नोव्हेंबर रोजी तंत्रज्ञान अधिविभागात सकाळी १० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

पुण्यनगरी



कोल्हापूर : रोहित कांबळे यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख. सोबत अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव.

# छायाचित्रकार रोहित कांबळे यांचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल विभागीय माहिती संचालक कार्यालयातील छायाचित्रकार रोहित कांबळे यांचा शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन कांबळे यांना गौरविण्यात आले. यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते. रोहित कांबळे पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विद्यार्थी आहेत. छायाचित्रांबरोबरच लघुपट, संहितालेखन, चित्रीकरण आदी क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. महापुराच्या काळात रोहित यांनी काढलेले छायाचित्र शासनाच्या 'लोकराज्य' नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर प्रकाशित झाले होते.

सकाळ

# आनंदी कॉलेजच्या खेळाडूंचा सत्कार

गगनबावडा : चंदीगड येथे झालेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रग्बी संघाच्या यशामध्ये आनंदी महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंचा सिंहाचा वाटा होता. या संघाने सात साईडमध्ये सुवर्णपदक, पंधरा साईडमध्ये रौप्यपदक प्राप्त केले होते. त्यांचा शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने विशेष सत्कार केला. क्रीडा विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, आनंदी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतीश देसाई, रग्बीचे मुख्य कोच दीपक पाटील, टीम कोच राहुल लहाने, क्रीडा विभागाचे अभिजित सरनाईक, सचिव डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा उपस्थित होते. खेळाडूंना अध्यक्ष, सचिव, प्राचार्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.